पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 21/03/2020 (शनिवार)
(दुपार)

---

## दुखापत

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत वलनी माईन्स येथे दिनांक 06/03/2020 चे 20.00 वा. ते 20.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जर्नाधन रामाधार कुरील, वय 37 वर्ष, रा. वलनी माईन्स यांच्या शेजारी राहणारा मन नावाचा मुलगा व आरोपी नामे– 1) हारून सिद्धीकी, 2) हलिम सिद्धीकी, दोन्ही रा. वलनी माईन्स यांच्यात भांडण सुरू असतांना फिर्यादीने आरोपीतांना हटकले असता आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीच्या डोक्यावर लाकडी दांडयाने मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार नामदेव धांडे 9764401246 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 25 कि. मी. अंतरावर मौजा कोरमेटा येथे दिनांक 20/03/2020 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– अशोक नामदेव निकोसे, वय 60 वर्ष, रा. कोरमेटा यांच्या घराकाठाने गायीला बांधण्या करिता खुटा गाडण्याकरीता गड्डा खोदण्याचे कारणावरून आरोपी नामे– पांडुरंग बापुराव शेंन्डे, रा. कोरमेटा याने फिर्यादीचे अंगावर दगड फेकुन मारला. तसेच आरोपीने फिर्यादीला हातबुक्कीने मारहाण करून जखमी केल. फिर्यादीचे भाऊ राजेंद्र निकोसे हे भांडण सोडविण्यास मध्यस्ती गेले असता आरोपीने त्यांच्या डाव्या हाताला दाताने चावा घेउन जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 337 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार दिपक मानवटकर 9657580153 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर